# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १७/०५/२०२५ (शनिवार)**

---

## मा. मुख्यमंत्री यांच्या १०० दिवस कृती आराखडा उपक्रम दुसरा टप्प्यामध्ये नागपूर विभागातुन उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर विभाग आणि पोलीस निरीक्षक, उमरेड पोलीस स्टेशन यांची प्रथम क्रमांकावर निवड

मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांच्या संकल्पनेतुन प्रशासनाला गतीमानता येण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयांसाठी १०० दिवसांचा कृती आराखडा हा उपक्रम सुरू करण्यात आला. यामध्ये दुसऱ्या टप्प्यामध्ये १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहीम राबवुन महाराष्ट्रातील सर्व विभागात विभागस्तरावर सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावलेली महाराष्ट्रातील तालुकास्तरीय शासकिय कार्यालयांचा समावेश होता. त्यामध्ये प्रत्येक शासकीय कार्यालयाच्या महसुल विभागातील उत्कृष्ट तीन तालुका कार्यालयाची निवड करण्यात आली आहे. **पोलीस विभागा अंतर्गत नागपुर विभागतुन सर्वोत्तम उपविभागिय पोलीस अधिकारी म्हणुन उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर यांची प्रथम क्रमांकाने निवड झालेली असुन सर्वोत्तम पोलीस निरीक्षक म्हणुन पोलीस निरीक्षक ,पोलीस स्टेशन उमरेड यांची प्रथम क्रमांकाने निवड झालेली आहे.**

या विशेष मोहिम अंतर्गत १) संकेत स्थळ (Website) २) कार्यालयीन सोईसुविधा ३) स्वच्छता ४) तक्रार निवारण ५) कामकाजातील सुधारणा ६) तंत्रज्ञानाचा वापर (Artificial Intelligence) यांच्यासह १० मुद्यांवर प्रभावी कार्यवाही करण्याबाबत निर्देश देण्यात आले होते. नागपूर ग्रामीण पोलीस घटकाच्या वतीने या उपक्रमा अंतर्गत देण्यात आलेले उद्दिष्टे १०० टक्के पुर्ण करून पारदर्शक, लोकाभिमुख आणि आधुनिक पोलिसींगच्या दिशेने महत्वपुर्ण पावले उचलण्यात आली आहेत.

**या उपक्रमाअतंर्गत उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालय सावनेर यांनी खालील मुद्द्यांवर विशेष कार्यवाही केली आहे.**

१. **सुकर जीवनमान** :—

**१.** नागरिकांना दिवाणी प्रकारच्या तक्रारींवर योग्य कायदेशीर सल्ला देण्यासाठी दिनांक १७/०४/२०२५ रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय येथे कायदेशीर मदत केंद्र कर्यान्वित करण्यात आले असुन त्यामध्ये अर्जदारांना तालुका स्तरावर व जिल्हास्तरावर मोफत वकील उपलब्ध करून त्यांना योग्य कायदेशिर सल्ला दिला जातो.

**२.** अपघातातील वाहने किंवा चोरीचा मुद्देमाल परत कसा मिळवायचा याबाबत नागरिकांच्या शंकेचे कायमस्वरूपी निसरन करण्यासाठी **सुपुर्दनामा बोर्ड** ही संकल्पना राबवुन एक असा बोर्ड तयार करण्यात आलेला आहे.त्यामध्ये आपला मुद्देमाल परत मिळविण्यसाठी काय करावे? कोणाला संपर्क करावा? या बाबी नमुद आहे. तसेच ज्या प्रकरणात मा. न्यायालयातुन आदेश होतो त्यासाठी नागरीकांना सुलभ व्हावे याकरीता सावनेर विभागातील सर्व पोलीस स्टेशनचे कोर्ट पैरवी अधिकारी यांचा संपर्क क्रमांक  बोर्ड वर नमुद करण्यात आला आहे. नमुद कोर्ट पैरवी नागरीकांना मार्गदर्शन करतात.

**२. स्वच्छता :—** स्वच्छता या मुद्दयावर काम करतांना अभ्यांनगत यांना स्वतंत्र प्रतीक्षालय तयार करण्यात आले, पुरुष व महीलांना  स्वच्छ पिण्याचे पाण्याची, स्वच्छ प्रसाधन गृहाची व्यवस्था करण्यात आली. पोलीस स्टेशन चे ईमारतीमध्ये नामफलक व दिशादर्शक फलक लावण्यात आले तसेच **जुने मुद्देमालाची निर्गती करण्यात येवुन उपविभागातील पोलीस स्टेशन परीसराची स्वच्छता करण्यात आली आहे. तसेच मुद्देमाल निर्गती मध्ये १७८ बेवारस वहनांचा लिलाव करण्यात आला आहे.**

३. **तक्रार निवारण :—** उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर यांनी सावनेर उपविभागातील नांदा गोमुख आणि जटामखोरा या गावातील नागरिकांच्या दारू विषयी चे तक्रारीबाबत दखल घेवुन ग्रामस्तरावर नागरीकांची बैठक घेवुन त्यांच्या समस्या सोडविल्या.

४. **क्षेत्रिय कार्यालयांना भेटी:—**

१. सावनेर उपविभागतील डब्ल्यु. सी. एल. भागात समाजविरोधी घटका कडुन गुन्हे केल्या जात होते. उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर यांनी त्या भागात पोलीसांची गस्त वाढवली तसेच **आरोपीतांविरूध्द योग्य गुन्हयाची नोंद करून १० आरोपीतांच्या टोळी वर संघटीत गुन्हेगारी अन्वये कारवाई केली असल्याने नमुद आरोपी हे ३ महीन्यांपासुन कारागृहात आहेत.** तसेच संपुर्ण डब्ल्यु सी एल भागात गस्त करून नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने कारवाई करण्यात आली . याबाबत डब्ल्यु सी एल यांनी पोलीसांना प्रशंसा पत्र दिले.

२. मौजा सुरेवानी येथे पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांच्या साठी योगा सत्र आयोजित करण्यात आले.

५. **ई ऑफिस प्रणालीचा वापर:**— उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालय, सावनेर आणि सावनेर उपविभागातील ४ पोलीस स्टेशनला १ जानेवारी २०२५ पासुन ई ऑफिस प्रणालीचा वापर सुरू असुन त्यात अधिकारी यांची आठवडा डायरी ,दप्तर तपासणी अहवाल, सर्व रजेचे अहवाल,वरीष्ठांकडुन प्राप्त सुचना अहवाल इत्यादी चा पत्रव्यवहार ई ऑफिस प्रणालीद्वारेच केला जातो.

**६. आर्थिक व औदयोगिक गुंतवणुकीस प्रोत्साहन**:— उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर यांनी त्यांच्या हद्दीतील उदयोजक/व्यापारी/कामगार वर्गाच्या संघटनांच्या बैठक घेवुन त्यांच्या अडचणी सोडविल्या. **तसेच गुंडावर सक्त कारवाई करून म.पो.का कलम ५६ प्रमाणे हद्दपार प्रस्ताव —२१ , म.पो.का कलम ५७ प्रमाणे हद्दपार प्रस्ताव —०१, एम. पी.डी.ए प्रमाणे —०४ आणि मकोका/संघटीत गुन्हेगारी —०२ या प्रमाणे कारवाया केल्या आहे.**

७. **अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण व सेवा विषयक बाबी** :—उपविभागिय पोलीस अधिकारी हे नोडल अधिकारी असुन iGOT Karmayogi Bharat या ॲप द्वारे अधिकारी /अंमलदार यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

**८. नाविन्यपुर्ण उपक्रम :—**

१. **सावनेर सेफ सिटी प्रोजेक्ट** अंतर्गत सावनेर शहरात **कृत्रिम बुध्दीमत्ता आणि चेहरे ओळखण्याची प्रणाली** असलेले **९९ अत्याधुनिक कॅमरे** लावण्यात आले आहे.त्यात वारंवार गुन्हे करणारे गुन्हेगारांचा डेटा संग्रहीत केल्या जाईल त्यामुळे गुन्हेगारांवर नियंत्रण मिळवता येईल.

२. सावनेर उपविभागात सावनेर – कळमेश्वर महामॅराथॉन **(एक धाव जागरूकतेसाठी)** आयोजीत केल्याने त्यात ग्रामीण भागातील सुमारे ६००० विदयार्थी, शिक्षक यांच्या सह स्थानिक नागरिकांनी सहभाग घेतला होता.त्यांना डायल ११२, तीन नविन कायदे, सायबर गुन्हे दामीनी पथक, वाहतुक नियम याबाबत जनजागृती करण्यात आली होती.

**या उपक्रमाअतंर्गत उपविभागिय पोलीस स्टेशन उमरेड यांनी खालील मुद्दयांवर विशेष कार्यवाही केली आहे.**

१. उपविभाग उमरेड अंतर्गत पोलीस स्टेशन उमरेड येथील पोलीस स्टेशन परीसर स्वच्छ करुन ईमारतीची रंगरंगोटी करण्यात आली. अभ्यांनगत यांना स्वतंत्र प्रतीक्षालय तयार करण्यात आले, पुरुष व महीलांना स्वच्छ पिण्याचे पाण्याची, स्वच्छ प्रसाधन गृहाची व्यवस्था करण्यात आली. पोलीस स्टेशन चे ईमारतीमध्ये नामफलक व दिशादर्शक फलक लावण्यात आले पोलीस स्टेशन चे आवारात सौदर्यीकरण करण्यात आले. सुकर जिवनमान चे अनुषंगाने तक्रार कर्त्यांचे सुख सुविधासाठी नवीन सुधारीत प्रक्रीया कार्यान्वीत करण्यात आली, **जेष्ठ नागरीकांनी** दिलेल्या तक्रारीचे निराकरणासाठी नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली असुन प्रत्येक शनिवारला त्यांचे अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहीती पुरविण्यात येत आहे.

२. सदर कालावधीत पोलीस स्टेशन उमरेड येथे **आपले सरकार पोर्टल द्वारे ऑनलाईन १८तक्रारी व प्रत्यक्षात ६० तक्रारी प्राप्त झाले असुन १०० टक्के** निराकरण करण्यात आले तसेच **ई ऑफीस प्रणाली द्वारे पोलीस स्टेशन ला ५३० कागदपत्रे प्राप्त झाली होती त्यांची सुध्दा १०० टक्के** निपटारा करण्यात आला आहे. सदर कालावधीत ४७ मुदतबाहय अभिलेखाचे वर्गीकरण करुन मृदतबाहय अभिलेख नष्ट करण्यात आले आहे. ११ जुने निरुपयोगी जडसंग्रह वस्तुची विल्हेवाट करण्यात आली असुन जुने लावारीश ३८ दुचाकी वाहणाची शासकीय नियमाप्रमाणे विल्हेवाट करण्यात आली आहे.

३. क्षेत्रीय कार्यालय भेटी अंतर्गत पोलीस स्टेशन हद्दीतील **१५ ग्रामपंचायत, १८ शाळा, ०३ ग्रामीण रुग्णालय, ०२ अंगणवाडी,** यांना भेटी देवुन त्यांचे अडीअडचनी समजावुन घेउन मार्गदर्शक सुचना देण्यात आले.

४. पोस्टे हद्दीतील व्यापारी, कामगार, गुंतवणुकदार यांचे ५ बैठका घेउन त्यामध्ये प्राप्त १२ समस्यांचे निराकरण गुंतवणुकदार,उदयोजकांना प्रोत्साहण देण्या करीता पोषक वातावरण तयार करण्यात आले.

५. पोलीस स्टेशन येथे नेमणुकीस असलेले ७ अधिकारी व ७२ पोलीस अंमलदार यांची **नवीन कायदा संबधी, CRIME OS, I GOT ,MPA** द्वारे कार्यशाळा प्रशिक्षण घेउन दोन पोलीस अंमलदार यांना, **SOCIAL MEDIA MONITERING** करीता नेमणुक करण्यात आली आहे.पोलीस स्टेशन अंतर्गत नाविन्यपुर्ण उपक्रमामध्ये पोलीस स्टेशन उमरेड तर्फे **SAFE ROAD PROJECT** सेफटी रोड प्रोजेक्टस राबविण्यात आला. बायपास चौक उमरेड,मोहपा फाटा उमरेड येथे अपघात टाळणे संबधाने **NHAI तज्ञ टिम** बोलावुन अपघात रोखणे संबधाने उपाययोजना करुन घेण्यात आले आहे. तसेच पोलीस स्टेशन अंतर्गत **रक्तदान शिबीर आयोजीत करुन त्यामध्ये ३८ पोलीस अधिकारी/पोलीस अंमलदार यांनी रक्तदान केले आहे.**

**मा.श्री हर्ष ए.पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी श्री अनिल मस्के सहा पोलीस अधिक्षक तथा उविभागिय पोलीस अधिकारी सावनेर आणि त्यांची चमु तसेच श्रीमती वृष्टी जैन सहा पोलीस अधिक्षक तथा उविभागिय पोलीस अधिकारी उमरेड, श्री धनाजी जळक, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन उमरेड आणि त्यांची चमु यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.**



भारत
अभियान


उप-विभागीय पोलीस अधिकारी
सावनेर विभाग सावनेर
जिल्हा - नागपूर (ग्रामिण)
तथा
प्रथम अपिलीय अधिकारी



दिव्यांग
करिता
मार्ग ››




बालमित्र पोलीस कक्ष
SATYARHI




प्रतिक्षालय


पोलीस ठाणे उमरेड
पोलीस स्टेशन, उमरेड
I TRUST NAGPUR RURAL POLICE
I TRUST UMRED POLICE
आजादी का अमृत महोत्सव
मेरी माटी मेरा देश

# ४. नागपूर विभाग

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक | तृतीय क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १. | उप विभागीय अधिकारी | नागपूर (शहर) | ब्रह्मपुरी | एटापल्ली |
| २. | तहसिलदार | नागभीड | कारंजा (घा.) | साकोली |
| ३. | उप अधिक्षक, भूमि अभिलेख | साकोली | गडचिरोली | नगर भू.क्र.१, नागपूर |
| ४. | दुय्यम निबंधक | काटोल - २. | कारंजा (घा.), | नागपूर शहर - ८ |
| ५. | गट विकास अधिकारी | कामठी | देवळी | कुरखेडा |
| ६. | तालुका वैद्यकीय अधिकारी | नागभीड | हिंगणा | देवळी |
| ७. | उप विभागीय कृषि अधिकारी | नागभिड | रामटेक | साकोली |
| ८. | तालुका कृषि अधिकारी | नरखेड | कोरपना | पवनी |
| ९. | उप विभागीय पोलीस अधिकारी | १. सावनेर<br>२. देवरी | १. आर्वी<br>२. अहेरी | १. साकोली<br>२. तिरोडा |
| १०. | पोलीस निरिक्षक | १. उमरेड<br>२. गोंदिया | १. तळेगाव<br>२. आष्टी | १. बल्लारपूर<br>२. तिरोडा |
| ११. | वन परिक्षेत्र अधिकारी | पवनी | देवलापार, नागपूर | हिंगणा |
| १२. | प्रकल्प अधिकारी, ए. बा. वि. | गडचिरोली (ग्रामीण) | धानोरा | चार्मोशी |
| १३. | बाल विकास प्रकल्प अधिकारी (श) | नागपूर जिल्हा पूर्व | नागपूर शहर पूर्व | नागपूर शहर मध्य |
| १४. | बाल संरक्षण अधिकारी | नागपूर (ग्रामीण) | मूल, चंद्रपूर | गोंदिया (ग्रामीण) |
| १५. | उप अभियंता म.जी.प्रा. | उपविभाग - ४, नागपूर | ज.व्य.उपविभाग,नागपूर | उपविभाग बल्लारपूर |
| १६. | सहायक पशुसंवर्धन आयुक्त, तालुका लघु पशु सर्व चिकित्सालय | वर्धा | वडसा | उमरेड |
| १७. | पशुधन विकास अधिकारी | खेमजाई ता. वरोरा | वडेगाव ता. तिरोडा | ब्राम्हणवाडा ता. कारंजा |
| १८. | मुख्याधिकारी नगरपरिषद / नगर पंचायत | देसाईगंज | नागभीड | वाडी जि. नागपूर |
| १९. | उप अभियंता (सार्वजनिक बांधकाम) | मूल | कळमेश्वर | कुरखेडा |
| २०. | उप अभियंता (जलसंपदा) | कोच्छी बॅरेज उपविभाग क्र.२ खापा, नागपूर | गोसीखुर्द उजवा कालवा उपविभाग क्र. ४, वाही ता. पवनी | दिंडोरा प्रकल्प उप विभाग क्र.१, चंद्रपूर |
| २१. | उप अभियंता (महावितरण) | आर्वी | मूल | भंडारा शहर |
| २२. | उप विभागीय जलसंधारण अधिकारी | भंडारा | सालेकसा | राजुरा |
| २३. | सहायक निबंधक (सहकारी संस्था) | उमरेड | देवरी | मोहाडी |
| २४. | उप कोषागार अधिकारी | उमरेड | एटापल्ली | कुही |
| २५. | तालुका क्रीडा अधिकारी | मुलचेरा | देवळी | बल्लारपूर |
| २६. | वैद्यकीय अधिक्षक | तिरोडा | ब्रम्हपूरी | तुमसर |
| २७. | गट शिक्षण अधिकारी | रामटेक | समुद्रपूर | पवनी |

## कौंटुबीक हिंसाचार करणाऱ्या आरोपीतांना कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. बोरी** :— फिर्यादी नामे राजिदंर कौर करमचंद उर्फ मनमोहनसिंग सुद, वय ४५ वर्षे, रा. २६/१५६६ बी हाउसिंग बोर्ड कॉलनी, जि. पंचकुला राज्य हरीयाणा यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन बोरी येथे अप क्र. ५०/२०१९ कलम ३०६,४९८ अ, ३०४ ब,३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत यप्रमाणे आहे की, फिर्यादीची मुलगी मृतक नामे सौ हरप्रीत शंकर जग्गी वय २२ वर्षे हीला **आरोपी क्र .१ तिचे पती— शंकर राजेंद्र जग्गी,वय ३२ वर्षे, आरोपी क्र .२ सासरे — राजेंद्र रामसिंग जग्गी,वय ६२वर्षे, आरोपी क्र .३ सासु— राणी राजेंद्र जग्गी ,वय ६० वर्षे, आरोपी क्र .४ दिर— राजेश राजेंद्र जग्गी,वय २६ वर्षे, सर्व रा. बुटीबोरी** यांनी मृतक हीला लग्नात माहेरच्यांनी आहेर च्या वस्तु कमी दिल्याचे कारणावरून लग्न झाल्यापासुन नेहमी शारीरीक मानसिक त्रास दिल्याने त्या त्रासाला कंटाळुन मृतक हीने विहीरी उडी घेवुन मरण पावली. तिचे मरणास आरोपी क्रं १ ते ५ असे कारणीभुत आहे अशा रिपोर्ट वरून गुन्हा नोंद आहे.

सदर प्रकरणाचे तपास पोलीस उपनिरीक्षक, श्री. मनोज मेश्राम , पोलीस स्टेशन बोरी यांनी करून सदर प्रकरण न्यायदानासाठी मा. न्यायालयात दाखल केले होते. सदर प्रकरणात मा. जिल्हा व सत्र न्यायधीश — ५ श्री. राहुल भोसले यांनी दिनांक १७/०५/२०२५ रोजी वरील नमुद आरोपी नामे **१ ते ४ यांना कलम ४९८ (अ), ३४ भादंवि अन्वये प्रत्येकी १ वर्षे ९ महीने सश्रम कारावास व ५ हजार रूपये दंड ,दंड न भरल्यास प्रत्येकी ०३ महिने सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्री. एल.बी. शेंदरे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन सहा.फौजदार /६२० अनिल व्यवहारे पो.स्टे.बोरी यांनी मदत केली आहे

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालय, सावनेर विभाग यांची कामगिरी

**दिनांक १७/०५/२०२५** रोजी श्री अनिल मस्के, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर यांच्या आदेशाने पोलीस स्टेशन सावनेर चे अधिकारी,उपविभागिय कार्यालय सावनेर आणि आरसीपी पथक क्र १ चे अंमलदारांनी पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीत मौज माहुरझरी फाट्याजवळ अचानक नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान पोलीसांनी नागपुर कडुन येणारा टाटा कंपनीचा टिप्पर **क्रमांक .एम एच ४० सी.एम.३५२७** या वाहनाला थांबवून वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये मध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक **रोहीत प्रकाश कुमरे, वय २४ वर्षे रा. पिपळा, डागबंगला, वार्ड क्रं २ खापरखेडा जि. नागपूर याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे कोणताही परवाना नव्हता. वाहन मालकाचे नाव पत्ता विचारले असता आरोपी वाहन मालक नामे धर्मेंद्र वर्मा, रा वर्धमान नगर, नागपुर याच्या सांगण्यावरून अवैधरित्या रेतीची वाहतुक केली जात आहे अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन **१) १० ब्रास रेती किंमती ३०,००० /— रूपये आणि २)** टिप्पर **क्रमांक .एम एच ४० सी.एम.३५२७ किंमती १०,००,०००/— रूपये असा एकुण १०,३०,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपीतांच्या विरूध्द पोस्टे कळमेश्वर येथे कलम ३०३(२),३(५), ४९ भा. न्या. संहिता, बि एन एस. सहकलम ४८ (८),४८ (७) महा. जमीन महसुल अधिनीयम, सह कलम ४,२१ खान व खनीजे अधिनीयम, सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद बोरी पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बोरी** :— दिनांक १६/०५/२०२५ रोजी बोरी पोलीस रात्रगस्त करीत असतांना पोलीसांनी गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, **नागपुर कडुन एका टाटा**

**आयसर वाहनामध्ये जनावरांचे अवैधरितत्या वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे बोरी पोलीसांनी नागपुर ते चंद्रपुर रोड वर शनिमंदीराजवळ** नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान **एक आयसर वाहन क्रं एम.एच. ४० सी.डी.३४६९ या वाहनाला** थांबवले. वाहनात चालकासह अजुन एक इसम बसुन होता. त्यांना नाव पत्ता विचारले असता वाहन चालक नामे **राहुल राजेश खन्ना, वय २७ वर्ष, रा. कामठी मच्छी पुल नागपुर ,आणि त्याच्या बाजुला बसलेला वाहन मालक मोहम्मद मुदस्सिर अब्दुल तव्वाब, वय २६ वर्षे, रा बन्ते नगर,उप्पलवाडी,कामठी रोड, नागपुर अशी माहीती प्राप्त झाली** . पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता वाहनाच्या डाल्यामध्ये त्यामध्ये **१६ गोवंश जनावरे** मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, गळयाला दोरखंडाने निर्दयतेने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून आयसर वाहन क्रं एम.एच. ४० सी.डी.३४६९ किंमती १०,००,०००/— रू. व १६ गोवंश जनावरे किंमती २,२१,००० /— रूपये असा एकूण किंमती १२,२१,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**सुटका केलेल्या जनावारांच्या देखभालीकरीता त्यांना श्रीकृष्ण गोरक्षण संस्था,तुरकमारी येथे दाखल करण्यात आले आहे.**

**नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन बोरी येथे महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम आणि प्राण्यांचा छळ अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आले आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द मौदा पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन मौदा**:— दिनांक १६/०५/२०२५ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, भंडाऱ्याकडून नागपूरच्या दिशेने एका हायवा ट्रक क्र.एम.एच. ४०

सी.टी. १६६९ मध्ये गौण खनिज रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. सदर माहीतीवरून मौदा पोलीसांनी मथनी टोल नाका येथे वाहनांची तपासणी केली असता हायवा ट्रक क्र.एम.एच. ४० सी.टी. १६६९ हा मिळून आल्याने वाहनाला थांबवुन वाहनाची पाहणी केली असतात्यामध्ये रेती आढळुन आली. ट्रक चालक **आरोपी नामे रंगराव मार्तड सोनवाने, वय ३९ वर्ष, रा.उकारा विर्शी, ता. साकोली जि.भंडारा याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष १) हायवा ट्रक क्र.एम. एच. ४० सी.टी. १६६९ किमती ४०,००,०००/रूपये व २) १० ब्रास रेती किंमती ३०,०००/— रूपये आणि असा एकुण ४०,३०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

नमुद प्रकरणी आरोपीतांवर कलम ३०३(२),३(५), ४९ भा. न्या. संहिता, बि एन एस. सहकलम ४८ (८),४८ (७) महा. जमीन महसुल अधिनीयम, सह कलम ४,२१ खान व खनीजे अधिनीयम, सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. वाहन चालक आरोपीस **अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास मौदा पोलीस करीत आहे.**

## पोलीस ठाणे खापा हद्दीतील ,अवैधरित्या दारू बाबत आरोपीतांवर कायदेशिर कार्यवाही दोन गुन्हे नोंद, स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**कारवाई क्रं १ :—** दिनांक १६/०५/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक खापा पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, **अमोल जगणे रा. नागलवाडी याने यशवंत जगणे यांचे शेताजवळ असलेला रेवणीचा नाला येथे मोहाफुल गावठी दारू काढण्याकरीता भट्टी लावली आहे. अशी माहीती मिळताच स्थानिक गुन्हे शाख पोलीसांनी खापा पोलीसांची संपर्क साधला. स्थानिक गुन्हे शाखा आणि खापा पोलीस यांनी** मिळालेल्या माहीतीच्या आधारे घटनास्थळी जावुन धाड टाकली असता आरोपी एक इसम पोलीसांना पाहुन जंगलाच्या दिशेने पळुन गेला.घटनास्थळावर पोलीसांना

दगडाचे चुलीवर हातभटटीद्वारे मोहाफुल दारू गाळत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी घटनास्थळावरून २०० लिटर मोहाफुल सडवा, ४० लिटर मोहाफुल गावठी दारू आणि दारू गाळण्याचे साहीत्य असा एकुण **किंमती १४,५०० /—** रुपयांचा मुददेमाल मिळुन आल्याने मोक्यावर पंचनामा कार्यवाही करुन मुददेमाल नष्ट करण्यात आला आहे. पळुन गेलेले इसमाचे नाव अमोल मुन्ना जगणे रा. नागलवाडी असे असल्याची माहीती प्राप्त झाली.

**कारवाई क्रं २:—** दिनांक १६/०५/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक खापा पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना सिरोजी फाटा जवळ दोन इसम मोटर सायकल वर बोरा घेवुन भरधाव वेगाने बडेगावच्या दिशेने जाताना दिसले. **मोटर सायकल संशयीत वाटल्याने पोलीसांनी त्यांचा पाठलाग केला. आरोपीतांनी मोटर सायकल आणि बोरा सावजी रोडवर सोडुन जंगलात पळ काढला. पोलीसांनी बोऱ्याची पाहणी केली असता त्यात एक एका रबरी टयुब मध्ये मोहाफुल गावठी दारू मिळुन आली.** पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून **रबरी टयुब मध्ये** ५० लिटर मोहाफुल गावठी दारू किंमती ५,०००/— रूपये आणि गुन्हयात वापरलेली मोटर सायकल क्रमांक एम.पी. २८ एफ ५१३५ किंमती ६५,०००/— रूपये असा एकुण **किंमती ६५,००० /—** रुपयांचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

नमुद प्रकरणी आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन खापा येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये **दोन गुन्हे नोंद करण्यात आले आहे.**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने